## गर्भपात करुन घेणे सुरक्षित असते का?

१९७२मध्ये गर्भपात कायदेशीर होण्यापूर्वी स्त्रियांना गुप्तपणे गर्भपात करावा लागत असे. धोकादायक औषधे व साधनांमुळे त्यांच्या जीवाला व आरोग्याला गंभीर धोका पोहोचण्याची शक्यता असे. आज मान्यताप्राप्त केंद्रांमधून व प्रशिक्षित डॉक्टरांकडून स्त्रियांनी गर्भपात करुन घेतल्यास गुंतागुंतीची शक्यता खूप कमी झाली आहे. गरोदरपणाच्या सुरुवातीच्या टप्प्यात (१२ [illegible] आठवडे) केला जाणारा गर्भपात अधिक सुरक्षित समजला जातो. ७०% गर्भपात हे पहिल्या १२ आठवड्यांमध्ये केले जातात असे अभ्यासांतून निदर्शनात आले आहे.

आरोग्य कर्मचाऱ्यांनी स्त्रीला तिच्या गरोदरपणाच्या टप्प्याविषयी तसेच तिच्या गर्भपातामधील संभाव्य गुंतागुंतीविषयी पूर्वकल्पना देणे आवश्यक आहे. गुंतागुंतीची लक्षणे कोणती व ती आढळल्यास कोणाशी संपर्क साधावा याविषयी माहिती देणे आवश्यक आहे.

## गर्भनिरोधकविषयक सल्ला

गर्भपातापूर्वी किंवा त्यानंतर स्त्रियांना गर्भनिरोधकांविषयी सल्ला दिला गेला पाहिजे. पण आरोग्यसेवकांनी त्यांच्यावर दबाव आणता कामा नये.

## स्त्रियांना अधिक माहिती कोठे मिळू शकते?

अधिक माहितीकरिता नजीकच्या सार्वजनिक आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा जिथून स्त्रियांना नजीकच्या गर्भपात सेवा केंद्राची माहिती मिळू शकेल.

**संकलन : दिव्या पटेल, लेनी चौधरी**


सेहत

(सेंटर फॉर इनक्वायरी इनटू हेल्थ अँड अलाईड थीम्स)

सर्व्हे नं. २८०४-२८०५, आराम सोसायटी रोड, वाकोला, सांताक्रूझ (पू.), मुंबई-४०० ०५५.

फोन : २६६७३१५४ ● २६६७३५७१ फॅक्स : २६६७३१५६

E-mail : cehat@vsnl.com Website : www.cehat.org


### स्त्रियांच्या माहितीकरिता पत्रक :

# गर्भपाताविषयी सर्वकाही

"भारतात गर्भधारणेपासून
२० आठवड्यांपर्यंत गर्भपात करुन घेणे
कायदेशीर आहे."



**गर्भधारणेपासून जेवढ्या लवकर गर्भपात करुन घेतला जातो तो तेवढाच सोपा व सुरक्षित असतो.**

(१९७१ च्या वैद्यकीय गर्भावस्था समापन कायद्याने स्त्रियांना, २० आठवड्याच्या म्हणजेच ५ महिन्यांच्या गर्भावस्थेपर्यंत सुरक्षित गर्भपात करवून घेण्याची तरतूद करुन दिली आहे.)

सुरक्षित गर्भपाताविषयी पुढील माहितीसाठी आपल्या सर्वात जवळच्या सार्वजनिक आरोग्य केन्द्राशी संपर्क साधावा.


विकासक : सेहत (सेंटर फॉर इनक्वायरी इनटू हेल्थ अँड अलाईड थीम्स)
सहाय्य : दि स्वीडीश इंटरनॅशनल डेव्हलपमेंट कोऑपरेशन एजन्सी (सीडा)

## गर्भपात म्हणजे काय?

गर्भपात म्हणजे वैद्यकीय (औषधांद्वारे) किंवा शल्यचिकित्सात्मक (शस्त्रक्रियेद्वारे) पद्धतीने गर्भधारणा संपुष्टात आणणे.

अनियोजित गर्भधारणा मोठ्या प्रमाणात आढळते. भारतामध्ये दर पाचपैकी एक गर्भधारणा नकोशी असते व तीनशेपैकी पाच स्त्रिया गर्भपाताची निवड करतात. सरकारी आकडेवारीनुसार भारतात दरवर्षी अंदाजे ७ लाख गर्भपात होतात परंतु संशोधकांच्या मते हा आकडा जवळपास ६७ लाख एवढा असण्याची शक्यता आहे. याचाच अर्थ असा की अनेक गर्भपात हे बेकायदेशीर मार्गाने व अप्रशिक्षित व्यक्तींकडून केले जातात व स्त्रियांच्या जीवाला व आरोग्याला गंभीर धोके पोहोचवू शकतात. हे पत्रक गर्भपाताविषयी आहे. यामध्ये गर्भपात व त्याच्याशी संबंधित बाबींविषयी माहिती दिलेली आहे.

## गर्भपात कायदेशीर आहे काय?

होय. १९७१ पासून २० आठवड्यापर्यंतच्या गर्भाच्या गर्भपातास कायदेशीर मान्यता आहे. पण काही विशिष्ट परिस्थितीतच स्त्रीयांना गर्भपाताची सुविधा मिळू शकते.

- ❖ स्त्रीच्या शारिरीक व मानसिक आरोग्यास धोका पोहोचण्याची शक्यता असेल तर किंवा
- ❖ जन्माला येणाऱ्या बाळाला तीव्र स्वरुपाचे मानसिक किंवा शारिरीक व्यंग असल्याचे निदान १२व्या आठवड्यापर्यंत एका डॉक्टरकडून १२ ते २० आठवड्यापर्यंत किमान दोन डॉक्टरांकडून करण्यात आले असेल तर
- ❖ गर्भनिरोधकांचा वापर अयशस्वी झाल्यामुळे विवाहीत स्त्रीला गर्भधारणा झाली असेल तर
- ❖ बलात्कार व लैंगिक अत्याचारामुळे गर्भधारणा झाली असेल तर

पण जर का स्त्रीच्या जीवाला धोका असेल तर गर्भधारणेच्या २०व्या आठवड्यानंतर देखील गर्भपात करता येतो.

## गर्भपाताकरिता स्त्रीला कोणाच्या परवानगीची गरज असते?

गर्भपाताकरिता स्त्रीला इतर कोणाच्याही परवानगीची गरज नसते. फक्त १८ वर्षाहून कमी वय असलेल्या किंवा मानसिक आजार असलेल्या स्त्रीच्या गर्भपाताकरिता तिच्या पालकांची/सांभाळ करणाऱ्यांची लेखी परवानगी आवश्यक असते. एरवी गर्भपाताकरिता स्त्रीचे वडील, पती, जोडीदार (गर्भधारणेसाठी जबाबदार पुरुष) किंवा कुटुंबातील अन्य व्यक्ति यापैकी कोणाच्याही परवानगीची आवश्यकता नसते.

## स्त्रीच्या गर्भपाताविषयी अन्य कोणालाही सांगितले जाते का?

नाही. गर्भपात ही गरोदर स्त्री व तिला आरोग्यसेवा देणारा आरोग्य सेवक यांच्यामधील गोपनीय बाब असते. याचाच अर्थ असा की, स्त्रीच्या परवानगीशिवाय ही माहिती अन्य कोणालाही दिली जाऊ शकत नाही.

## गर्भपात कोठे करुन घेता येतो?

सरकारी रुग्णालये किंवा केंद्रांमध्ये गर्भपात करुन घेण्याची सेवा मोफत उपलब्ध असते. खाजगी दवाखाने व रुग्णालयांमध्येदेखील सदर सेवा शुल्कासहित उपलब्ध होऊ शकते. गर्भपाताकरिता घेण्यात येणारे शुल्क हे गरोदरपणाच्या टप्प्यावर व गर्भपाताच्या पद्धतीवर अवलंबून असते.

## स्त्रीला गर्भपाताच्या पद्धतींचे कोणकोणते पर्याय उपलब्ध आहेत?

स्त्रीचे गरोदरपण कोणत्या टप्प्यात आहे यावर पर्यायांची उपलब्धता अवलंबून असते व तिच्या डॉक्टरांनी तिच्याशी त्याविषयी चर्चा करणे आवश्यक असते. गर्भपाताच्या पद्धतीमध्ये दोन पर्याय उपलब्ध आहेत. वैद्यकीय (गर्भपाताची गोळी) किंवा शल्यचिकित्सात्मक गर्भपात.

- ❖ वैद्यकीय गर्भपातामध्ये गर्भपाताकरिता औषधे दिली जातात. भारतामध्ये हा पर्याय ९ आठवड्यापर्यंतच्या गर्भावस्थेकरिता उपलब्ध आहे.
- ❖ शल्यचिकित्सात्मक गर्भपातामध्ये अनुभवी डॉक्टरांच्या मदतीने गर्भ काढून टाकला जातो.